युवाशक्ती हे देशाचे चैतन्य : सागर पाटील >>पान 2

देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी मस्साजोगमधील ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन >>पान 3


पांगरखेड वीज उपकेंद्राचा प्रश्न मार्गी लावणार - संजय रायमुलकर >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

नम्रता हीच खरी सज्जनतेची ओळख आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



शॉर्ट ड्रेसमध्ये हलवली कंबर, 'आशिकी' फेम अभिनेत्री ट्रोलर्सच्या निशाण्यावर, म्हणाले, 'ही गलिच्छ...'
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 141 ■ गुरूवार, दि. 02 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# नववर्षासोबत गडचिरोलीत विकासाची नवी पहाट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक आपला विदर्भ

## माओवाद्यांनी संविधानाचा मार्ग स्विकारावा

- ताराक्कासह ११ जहाल नक्षलवादी शरण
- स्वातंत्र्याच्या ७७ वर्षात प्रथमच अहेरी-गर्देवाडा बससेवा सुरु
- लॉईड्च्या विविध उपक्रमांचा शुभारंभ, ६,२०० कोटींची गुंतवणूक, ९००० रोजगार
- कामगार आणि पूर्वाश्रमीच्या नक्षलवाद्यांना कंपनीचे १००० कोटींचे समभाग प्रदान
- गडचिरोलीपासून २०० कि.मी. दूर पेनगुंडा येथे जवान, ग्रामस्थांशी संवाद
- सी-६० जवानांचाही सत्कार
- पोलीस दलाला ५ बस, १४ चारचाकी, ३० मोटारसायकलीचे लोकार्पण

**गडचिरोली/प्रतिनिधी : नववर्षाचा पहिला दिवस गडचिरोलीसाठी विकासाची नवीन पहाट घेवून आला असून विकासाच्या, सामाजिक सलोख्याच्या, शांततेच्या आणि औद्योगीकरणाच्या दिशेने गडचिरोलीची वाटचाल सुरू राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.**

नवीन वर्षाचा पहिला दिवस मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यात व्यतित केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा अशी बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला आणि त्या बसमधून प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६ हजार २०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे.

आज सकाळी गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाल्यावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस हे थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे त्यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. हा परिसर अतिदुर्गम व नक्षलप्रभावीत मानला जातो. थेट मुख्यमंत्र्यांनी त्याठिकाणी जाऊन एक वेगळा संदेश दिला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री आहेत.

त्यानंतर दुपारी कोनसरी येथे, लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यात कोनसरी येथे डीआयआय प्लांट (४०० कोटी रुपये गुंतवणूक, ७०० रोजगार), पेलेट प्लांट आणि स्लरी पाईपलाईन (३००० कोटी रुपये गुंतवणूक, १००० रोजगार), हेडरी, एटापल्ली येथे आयर्न ओअर ग्राईडिंग प्लांट (२ हजार ७०० कोटी रुपये गुंतवणूक, १ हजार ५०० रोजगार), वन्या गारमेंट युनिट (२० कोटी रुपये गुंतवणूक, ६०० रोजगार) याचा समावेश आहे. शिवाय लॉईडस काली अम्मल हॉस्पीटल आणि लॉईडस राज विद्यानिकेतन सीबीएसई शाळेचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केला. सुमारे १ हजार २०० विद्यार्थ्यांना येथे शिक्षण मिळणार आहे. पोलिसांसाठी निवासस्थाने, जिमखाना, बालोद्यान इत्यादींचेही लोकार्पण करण्यात आले. कामगार आणि पूर्वाश्रमीच्या नक्षलवाद्यांना कंपनीचे १००० कोटींचे समभाग प्रदान करुन एकप्रकारे मालकी देण्याचाही स्तुत्य उपक्रम लॉईड्सने हाती घेतला. हे समभाग मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचाही शुभारंभ करण्यात आला. यातून खाणींचे संरक्षण होणार असून लोहखनिजासाठी स्लरी पाईपलाईनमुळे इंधन बचत होणार, कार्बन उत्सर्जन कमी होणार, रस्त्यावरील अपघातही कमी होणार आहेत. ग्रीन माईनिंगचा प्रयोग देशातून गडचिरोलीत प्रथमच राबविण्यात येत आहे. गोंडवाना विद्यापीठ ऑस्ट्रेलियन विद्यापीठाशी एक करार करणार असून, त्यातून मायनिंगशी संबंधित सर्व अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. यातून गडचिरोलीतील तरुणांना रोजगार मिळणार आहे, अशीही माहिती, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिली.

११ जहाल नक्षलींचे समर्पण

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत आज ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यात ८ महिला आणि ३ पुरुष आहेत. यात दोन दाम्पत्य आहेत. या ११ जणांवर महाराष्ट्रात १ कोटींपेक्षा अधिकचे बक्षीस होते. छत्तीसगड सरकारने सुद्धा त्यांच्यावर बक्षिस जाहीर केले होते. यात दंडकारण्य झोनल कमिटीच्या प्रमुख आणि भूपतीची पत्नी ताराक्का आहेत. ३४ वर्षांपासून त्या नक्षली चळवळीत आहेत. ३ डिव्हिजन किमिटी मेंबर तर १ उपकमांडर, २ एरिया कमिटी मेंबर आहेत. या सर्वांना पुढचे जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली. निवडणूक आचारसंहितेच्या काळात ५ नक्षली ठार झाले. २०२४ या वर्षांत २४ नक्षली ठार झाले आणि १८ माओवाद्यांना अटक करण्यात आली. गेल्या ६ महिन्यात १६ जहाल नक्षलवादी आणि आज ११ असे २७ जण मुख्य प्रवाहात आले आहेत. पोलीस दलाच्या प्रयत्नामुळे सातत्याने माओवादींचे आत्मसमर्पण सुरू असून यामुळे माओवादाची कंबर तोडण्याचं काम होत असल्याचे ते म्हणाले.

उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली, लवकरच दक्षिण गडचिरोली सुद्धा होईल. गेल्या ४ वर्षांत एकही युवक किंवा युवती माओवादात सहभागी झाली नाही, ही फार मोठी उपलब्धी आहे. ११ गावांनी नक्षलवाद्यांना बंदी केली आहे. सी-६० च्या जवानांनी जनतेचा विश्र्वास संपादन केला. आता संविधानविरोधी चळवळीत कुणीही जायला तयार नाही, ही आनंदाची बाब आहे. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानेच मिळू शकतो, तो माओवादी विचारसरणीने मिळू शकत नाही, हे जनतेला आता पटले आहे. येत्या काळात गडचिरोलीला पोलाद सिटीचा दर्जा मिळणार, असे श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते पोलीस दलाला ५ बस, १४ चारचाकी, ३० मोटारसायकलीचे लोकार्पण करण्यात आले. तसेच येथील पोलीस दलाच्या नूतन हेलिकॉप्टर हँगर चे उद्घाटनही करण्यात आले. तसेच विविध नक्षल चकमकीमध्ये शौर्य दाखविणाऱ्या सी-६० च्या पोलीस जवानांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, विशेष पोलीस महानिरीक्षक दिलीप भुजबळ पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. निलोत्पल, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आ. डॉ. मिलिंद नरोटे, पद्मश्री पूर्णामासी जानी, पद्मश्री परशुराम खूणे, लॉईड्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन उपस्थित होते.

## २५ जानेवारीला मोठ्या संख्येने अंतरवाली सराटीत या; जरांगे पाटील यांचे मराठा समाजाला आवाहन



**नांदेड/प्रतिनिधी :** लोहा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी सर्व मराठा समाजाला २५ जानेवारीला अंतरवाली सराटी येथे येण्याचे आवाहन केले आहे. मराठ्यांनी इतर ठिकाणी उपोषण, आंदोलन न करता अंतरवालीतील सामुहिक आमरण उपोषणामध्ये सहभागी व्हावे. सरकारला घुडग्यावर टेकवायची ताकद फक्त मराठ्यांमध्ये आहे असे देखील मनोज जरांगे पाटील यावेळी म्हणाले आहेत.

## सोलापूर-धुळे महामार्गावरील महाकाळ येथे उभ्या ट्रकला भरधाव कारची धडक होऊन भीषण अपघात



**जालना/प्रतिनिधी :** आज दुपारी बारा वाजेच्या सुमारास जालना जिल्ह्यातील महाकाल येथे सोलापूर धुळे महामार्गावर उभ्या ट्रकला भरधाव कारने पाठीमागून धडक दिल्याने अपघात झाला आहे. यामध्ये कार मध्ये असलेल्या चार जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. हे कुटुंब नवीन वर्षानिमित्त अक्कलकोट वरून गणपुरला जात होते यावेळी महाकाळ जवळ उभ्या असलेल्या ट्रकवर त्यांची ही कार आदळली त्यामुळे हा भीषण अपघात झाला. यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांनी याची माहिती गोंदी पोलिसांना दिली त्यावेळी गोंदी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवले आहे.

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी एसआयटी स्थापन





## आयपीएस बसवराज तेलींच्या नेतृत्वात १० जणांची टीम, तपासाला आला वेग



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील सरपंच हत्याप्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्यात आला असून खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडलाही पोलिसांनी अटक केली आहे. तसेच, न्यायालयाने आरोपी वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी दिली असून संतोष देशमुख हत्याप्रकरणातील फरार आरोपींचाही शोध घेतला जात आहे. आता, राज्य शासनाकडून संतोष देशमुख हत्येप्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांच्या नेतृत्वात ही समिती स्थापन करण्यात आली असून तेली यांच्यासह १० जणांची टीम या घटनेचा सखोल तपास करणार आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाच्या तपासला वेग येणार आहे.

मस्साजोग, ता. केज, जि. बीड येथील सरपंच श्री. संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपरोक्त संदर्भ येथील शासन निर्णयान्वये विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. सदर पथकात पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नियुक्ती करण्याची बाब शासन विचाराधीन होती, त्यानुसार ही एसआयटी गठित करण्यात आल्याचं गृह विभागाने परिपत्रकातून म्हटलं आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलीस ठाणे, बीड येथे गु. र. क्र. ६३७/२०२४ भा.न्या. सं., कलम १४०(१), १२६(२), ११८(१), ३२४(४) (५), १८१(२), १९१(२), १९०, १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली (भा.पो.से.), पोलीस उपमहानिरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सी.आय.डी., पुणे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच, बसवराज तेली यांनी शासनाकडे मागणी केल्यानुसार सदर विशेष तपास पथकामध्ये खालील काही अधिकारी व अंमलदार यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे.१० जणांची एसआयटी टीम

आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली - पोलीस उपमहानिरीक्षक

अनिल गुजर - पो. उप अधीक्षक

विजयसिंग शिवलाल जोनवाल- स.पो. निरीक्षक

महेश विघ्ने - पो.उ.निरीक्षक

आनंद शंकर शिंदे- पो.उ.निरीक्षक

तुळशीराम जगताप - सहा. पो. उ. निरीक्षक

मनोज राजेंद्र वाघ - पोलीस हवालदार/१३

चंद्रकांत एस.काळकुटे - पोलीस नाईक /१८२६

बाळासाहेब देविदास अहंकारे - पोलीस नाईक/१६७३

संतोष भगवानराव गित्ते - पोलीस शिपाई/४७१

बसवराज तेली २०१० चे खझड अधिकारी

नागपूर शहर पोलीस उपायुक्त म्हणून जबाबदारी पार पाडल्यानंतर बसवराज तेली यांच्याकडे सांगलीच्या पोलीस अधीक्षकपदाची जबाबदारी देण्यातआली होती. सन २०१० च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले डॉ. तेली हे एमबीबीएस डॉक्टर असून ते मूळचे बेळगाव जिल्ह्यातील रायबाग तालुक्यातील खंदीबुद या गावाचे सुपुत्र आहेत. पोलीस दलातील त्यांच्या सेवेस महाराष्ट्रातील पाचोरा (जि.जळगाव) येथून झाली. त्यानंतर त्यांनी औरंगाबाद येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून, पुणे येथे शह उपायुक्त म्हणून काम केले. तर, सांगलीचे पोलीस अधीक्षकपदही सांभाळले होते, सध्या ते पोलीस उपमहानिरीक्षकपदावर कार्यरत आहेत.

# चार वर्षांपासून 'तारीख पे तारीख'चा खेळ सुरुच

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकीय साठमारीत गेल्या चार तारीख पे तारीख झाल्याने जिल्हा परिषदा आणि मनपांच्या निवडणुका रखडल्या आहेत. गेल्या चार वर्षांपासून फक्त तारीख पे तारीख झाल्याने सुप्रीम कोर्टात अजूनही तोडगा निघालेला नाही. अशा स्थितीत आता पुढील सुनावणीची तारीख सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारीला असून निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे.

## यंदा तरी मरणासन्न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीला मुहूर्त लागणार?



राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०20 पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीची तयारी तर तीन वेळा करण्यात आली.

### कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित?

**-महापालिका-**

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण - डोंबिवली, उल्हासनगर , भिवंडी-निजामपूर, वसई- विरार, मिरा-भाईंदर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी या पालिकेच्या निवडणुका प्रलंबित आहेत.

**-जिल्हा परिषद-**

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव, लातूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा

आज राज्यात एकही महानगरपालिका, जिल्हा परिषदेवर लोकप्रतिनिधी नाहीत, तेथील सगळा कारभार प्रशासकांच्या हाती देण्यात आला आहे. लोकसभेसह विधानसभा निवडणुकाही संपल्या असून स्थिर सरकार सत्तेत आले आहे. त्यामुळे महायुती सरकार लवकरात लवकर या निवडणुका घेईल, अशी अपेक्षा आहे. महायुतीला स्पष्ट बहुमत दिल्यामुळे सध्या चांगले वातावरण आहे.

## चिंताजनक विमान दुर्घटना

दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान रविवारी मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले. या अपघाताने संपूर्ण जगात हळहळ व्यक्त करण्यात आली. विमान अपघात घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा जीव गेल्याची ही जगातील पहिलीच घटना नाही. या आधीही विमान अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षीच म्हणजे २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. कोरियात झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे मात्र विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यानंतरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. मागील वर्षी नेपाळमध्ये झालेला विमान अपघात हा खराब हवामानामुळे झाला होता. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्र्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. काही वेळा पक्षाची धडक बसल्याने विमान अपघात झाल्याचे सांगण्यात येते. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा यात जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजार १६४ विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारततही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने सुदैवाने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. संजय गांधी, माधवराव सिंधिया, जी एम सी बालयोगी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. दोन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

# युवाशक्ती हे देशाचे चैतन्य : सागर पाटील

## उत्कर्ष फाउंडेशन व युवक बिरादरी कडून शिवाजी शाळेत एक सुर एक ताल कार्यक्रम संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** युवा हा देशाचा प्राण आहे. युवाशक्ती हे देशाचे चैतन्य आहे. ही शक्ती योग्य ठिकाणी एकवटली की त्यातून विकासाची नवी वाट ठरत असते,असे मत मेहकर नगर पालिकेचे माजी सभापती सागर पाटिल यांनी लोणी गवळी येथील शिवाजी शिक्षण संस्थेत दि.३१ डिसेंबर रोजी नववर्षाचे जल्लोषात स्वागत व्हावे शालेय जीवनात युवकानं मध्ये नव चैतन्य निर्माण व्हावे यासाठी मेहकर लोणार मतदार संघाचे लोकप्रिय आमदार तथा उत्कर्ष फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या संकल्पनेतून उत्कर्ष फाउंडेशन व युवक बिरादरी यांच्या संयुक्त विद्यमाने एक सुर एक ताल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी प्रसंगी उपस्थित सागर पाटिल यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भास्कर पाटील, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक पुरुषोत्तम बोर्डे, शिवसेना नेते भागवत





बोरकर, एक सुर एक ताल अभियानाचे प्रशिक्षक आंतर राष्ट्रीय गायक संगीतकार प्रा अतुल सुंदरकर, दिग्दर्शक अक्षय जाधव, पंकज उनोने, अंकुश मालवे, प्रविण पवार, कृष्णा रत्नपारखी,यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना सागर पाटील म्हणाले की मेहकर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात हे उच्च विद्याविभूषित आमदार आहेत त्यांनी रोजगाराच्या दृष्टीने तरुण युवक हा मुख्य घटक ठरविला असून प्रत्येक घरात एका व्यक्तीला रोजगार देण्याचे आश्र्वासन दिले होते त्याचाच एक भाग म्हणून गेल्या काही महिन्यापूर्वी मेहकर येथे रोजगार मेळावा आयोजित करून ६५० युवकांना विविध मोठ मोठ्या कंपनीत रोजगार उपलब्ध करून दिला आहे, या पुढेही युवकांना मार्गदर्शन मेळावे,रोजगार मेळावे, आयोजित करून विविध संधी उपलब्ध करून देणारे आपले आमदार आहेत असेही पाटील म्हणाले,या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन त्यांना मराठी गाणे,हिंदी, गुजराती, आसामी,बंगाली, पंजाबी, कन्नड, बांगला गीत प्रत्यक्षिक करून शिकवले, त्या मुळे विद्यार्थी अतिशय मंत्रमुग्ध आणि एकरूप झाले होते, या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी श्री चव्हाण सर, पाटील सर, गव्हाड सर व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## शॉर्ट ड्रेसमध्ये हलवली कंबर, 'आशिकी' फेम अभिनेत्री ट्रोलर्सच्या निशाण्यावर, म्हणाले, 'ही गलिच्छ...'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई : १९९० मध्ये दोन स्टार्स एका रात्रीत फेमस झाले. एक म्हणजे अनु अग्रवाल आणि राहुल रॉय. दोघांनी महेश भट्ट दिग्दर्शित ब्लॉकबस्टर 'आशिकी' द्वारे मोठ्या पडद्यावर पदार्पण केले. हे ते स्टार्स आहेत ज्यांनी पहिल्याच चित्रपटापासून अशी खळबळ उडवून दिली की ते लोकांच्या आयुष्यात लोकप्रिय झाले. १९९९ मध्ये अनु अग्रवाल एका भीषण अपघाताची शिकार झाली. या अपघातानंतर ती २९ दिवस कोमात होती. तिची पूर्ण स्मरणशक्ती गेली. आजकाल ती कोणत्याही चित्रपटाचा भाग नाही. पण ती सोशल मीडियावर खूप सक्रिय राहते. अलीकडेच त्याने एक व्हिडिओ शेअर केला आहे, जो पाहिल्यानंतर त्याचे चाहते वेडे झाले आहेत.

अनु अग्रवालने तिच्या मुलाखतींमध्ये पुन्हा चित्रपटात काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सध्या तिला काम मिळत नसल्याने ती सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्या चाहत्यांच्या संपर्कात असते. अलीकडेच त्याने एक व्हिडिओ शेअर केला, जो पाहिल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी तिला असं काही करू नको असा सल्ला दिला.

शॉर्ट ड्रेस आणि विचित्र डान्स

अनु इंस्टाग्रामवर खूप सक्रिय आहे आणि तिच्या वैयक्तिक आयुष्यातील फोटो आणि व्हिडिओ ती शेअर करत असते. अनुने नुकताच एक छोटा व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती शॉर्ट ड्रेस घालून डान्स करताना दिसत आहे.

व्हिडीओ शेअर करत अनुने लिहिलंय, 'आयुष्य पुरेपर जगा! पार्टी करा, मेहनत करा, ध्यान करा, हा माझा मंत्र आहे.' मात्र, त्याच्या चाहत्यांनी त्याला सोशल मीडियावर ट्रोल करण्यास सुरुवात केली.

एका चाहत्यानं लिहिलंय, 'कृपया, मी तुमचा खूप आदर करतो आणि मला असे वाटत नाही की कोणीही तुमच्यावर चुकीची कमेंट करू नये. 'दुसऱ्या युझरने लिहिलंय, 'उत्तम दर्जाचे व्हा. ही स्वस्ताई काय आहे?' आणखी एकाने लिहिलंय, 'ती इतकी स्वस्तात का नाचते आहे? म्हातारपणात तारुण्य येत आहे.' त्याचप्रमाणे, ' हे १९९० नाही मॅडम. तुम्ही मोठे होऊन हे मुलांचे फ्रॉक घालणे कधी बंद कराल?', 'हे खूपच स्वस्त आहे, कृपया राखी सावंत-शर्लिन चोप्राला वाचवा' अशाही कमेंट्सही केल्यात.

## नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर नगरपालिकेच्या पथकाची करडी नजर

**जळगाव/प्रतिनिधी :** मकर संक्रांत सण हा दिवासांवर येऊन ठेपला आहे. सण सुरु होण्याआधीच शहरात नागरिकांकडून पतंग उडवण्यास सुरुवात होते. पतंग विक्री करणारे विक्रेते स्वतःच्या फायद्यासाठी पतंग विक्री सोबत शासनाने बंदी घातलेल्या नायलॉन मांजा देखील विक्री करतात. बंदी असलेल्या मांज्यामुळे नागरिकांना व पशुपक्षींना दुखापत होते. तर अशा कोणत्याही घटना घडू नये यासाठी नगर परिषदेच्या वतीने पथक नेमण्यात आले आहे. या पथकाच्या वतीने शहरातील पतंग विक्रेत्यांकडे जाऊन तपासणी करण्यात येणार आहे. यात पोलिसांची देखील मदत घेण्यात येणार आहे. बंदी असलेल्या नायलॉन मांजा विक्री करताना कोणी आढळल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील यांनी सांगितले.



## शिराळा येथील जनावरांच्या पहिल्याच आठवडी बाजाराला पशुपालकांचा चांगला प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** शिराळा येथे भरणारा जनावरे बाजार कोरोना व इतर अडचणींमुळे बंद झाला होता. तालुक्यातील शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना जनावरे खरेदी व विक्री करण्यासाठी वडगाव कराड या ठिकाणी जावं लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक हानी होत होती. आता शेतकऱ्यांचा वेळ व पैसेही वाचणार आहेत आणि शेतकऱ्यांची फसवणूक देखील होणार नाही. हा बाजार कायमस्वरूपी सुरू राहावा यासाठी बाजार समिती सर्व सुख सुविधा पुरवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. यावेळी गाय, म्हैस, बैल, शेळ्या मोठ्या संख्येने बाजारामध्ये उपलब्ध होत्या. उपस्थित शेतकरी व व्यापारी सुरज निकम यांची गाय राजवर्धन देशमुख यांनी खरेदी केली तसेच विकास कांबळे यांचा बैल बबलू माळी यांनी खरेदी केला. साहिल मुल्ला वाटेगाव यांची गाय संभाजी नलवडे यांनी खरेदी केली व शिवाजी खरसुंडीकर यांची सर्व खोंडे विकली गेली.

सोमवारी वडगाव येथे मोठा बाजार भरला जातो यामुळे तालुक्यातील सर्व व्यापारी वडगाव येथे खरेदी व विक्री करण्यासाठी जात असतात. त्याचा परिणाम आपल्या सोमवारच्या बाजारावर होऊ शकतो. या अनुषंगाने शेतकरी व्यापारी व बाजार समितीच्या सर्व पदाधिकारी या सर्वांनी असा निर्णय केला की इथून पुढे होणारा शिराळा मधला जनावरांचा आठवडे बाजार बुधवारी भरवण्यात येणार आहे. यावेळी शेतकरी व व्यापाऱ्यांच्या हस्ते जनावर बाजारांचा शुभारंभ करण्यात आला.












DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### चोपड्यात बदलत्या वातावरणामुळे सर्दी, खोकला, तापाच्या रुग्ण संख्येत वाढ

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** गेल्या आठवड्यात राज्यामध्ये काही भागात अवकाळी पाऊस ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. चोपडा तालुक्यातील काही भागांमध्ये पाऊस व ढगाळ वातावरणामुळे साथीच्या रोगास पोषक वातावरण निर्माण झाल्याने चोपडा तालुक्यात सर्दी, खोकला, तापाच्या रुग्ण संख्येत वाढ झाली आहे. चोपडा उपजिल्हा रुग्णालयात वातावरण बदलामुळे साथीच्या रोगास पोषक वातावरण निर्माण झाल्याने त्याचा परिणाम नागरिकांवर झाला आहे. दररोज ५०० ते सातशे रुग्णांचे ओपीडी होत असल्याचे चोपडा उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर सुरेश पाटील यांनी सांगितले.

### माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांना रुग्णालयातून मिळाला डिस्चार्ज





दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची तब्येत बिघडल्याने त्यांना भिवंडी येथील आकृती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. आज त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. आज शिवाजी पार्कवर क्रिकेट खेळून दाखवणार की मी कधीही क्रिकेट सोडणार नाही असे सांगत नवीन वर्षात इन्जॉय करा पण दारूपासून लांब रहा असे आवाहन विनोद कांबळी यांनी नागरिकांना केले आहे.

### मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी घेतले खंडोबाचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माळेगाव यात्रेला काही दिवसापासून सुरुवात झाली आहे. आज मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह श्री क्षेत्र माळेगाव येथे खंडोबाचे दर्शन घेतले यावेळी लोहा कंधारचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत केले. माझे जुने सहकारी प्रदीप नाईक यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबावर आलेल्या दुःखातून सावरण्याची देव त्यांना शक्ती देवो आणि त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही सदिच्छा व्यक्त करतो व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो अशी प्रतिक्रिया यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

### उभ्या असलेल्या आयशर ट्रकला दुचाकीची धडक; दुचाकी स्वार जागीच ठार

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** आज दिनांक १ जानेवारी २०२५ वार बुधवार रोजी सायंकाळी ७ वाजून २० मिनिटाला



भोकरदन तालुक्यातील धावडा येथे धावडा गोद्री या मुख्य रोडवर उभ्या असलेल्या आयशर ट्रक क्रमांक चक १९न३५५४ ला दुचाकी धडकून भिषण अपघात झाला आहे,यामध्ये दुचाकी स्वराचा या अपघातात जागीच मृत्यू झाला आहे, या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव राजू काळे राहणार शिवाना तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून या घटनेची माहिती मिळताच पारध पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष माने व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उत्तरी तपासणी करिता धावडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहे.





# देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी
# मस्साजोगमधील ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना अटक व्हावी यासाठी मस्साजोग येथील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. आज ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलन केले आहे. आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले आहेत. देशमुख हत्या प्रकरणात सात आरोपीं विरोधात गुन्हा दाखल असून त्यातील चार आरोपींना पोलिसांनी अटक केली असली तरी उर्वरित तीन आरोपी अद्याप फरार आहे. घटनेला २२ दिवस उलटून देखील आरोपी सापडले नसल्याने नागरिकांनी हे आंदोलन केले आहे.

## नववर्षासोबत गडचिरोलीत विकासाची नवी पहाट













### गंगा, गोदावरी आरतीच्या धर्तीवर आता दर मंगळवारी होणार पांझरा नदीची महाआरती



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहराची आणि जिल्ह्याची ओळख असलेली पांजरा नदी ही जीवनदायींनी असून गेल्या अनेक वर्षात पांझरा नदीच्या स्वच्छतेसह तिला प्रदूषण मुक्त करण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. या पार्श्र्वभूमीवर पांझरा नदी बारमाही व्हावी तसेच ती प्रदूषण मुक्त होऊन नदीचे दैविक अधिष्ठान जागृत व्हावे, गंगा आणि गोदावरी नदीच्या धर्तीवर पांझरा नदीच्या आरतीचा उपक्रम सुरू व्हावा तसेच यातून धुळेकर नागरिकांची नदी बद्दलची धार्मिक भावना सुदृढ व्हावी या उद्देशाने पांझरा नदीच्या महाआरतीला आजपासून सुरुवात करण्यात आली. गंगा आणि गोदावरीच्या धर्तीवर ही आरती करण्यात येत असून दर मंगळवारी ही आरती केली जाणार आहे. आरतीला धुळेकर नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.



## विविध वृत्त...

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव गुरुवार दि. २ जानेवारी २०२४ रोजी बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार दि. २ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मेहकर येथून मोटारीने बुलढाणाकडे प्रस्थान. दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे आगमन व सोयीनुसार मातोश्री शिवाजी नगर मेहकरकडे प्रयाण करतील.

## जिल्ह्यातील खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सन २०२४-२५ च्या खरीप हंगामातील प्रमुख पिकांची जिल्ह्याची सरासरी अंतिम पैसेवारी ५१ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ४२० गावे आहेत. यातील १ हजार ५८ गावांची खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे. तर ३६२ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

५० पैसेपेक्षा कमी अंतिम पैसेवारी : देऊळगाव राजा येथे ६४, मेहकर येथे १६१, लोणार येथे ९१, सिंदखेड राजा येथे ११४, मलकापूर येथे ७३, नांदुरा येथे ११२, खामगाव येथे १४६, शेगांव येथे ७३, जळगांव जामोद येथे ११९ व संग्रामपूर येथे १०५ असे एकूण १ हजार ५८ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा कमी आहे. ५० पैसेपेक्षा जास्त अंतिम पैसेवारी : बुलढाणा तालुक्यात ९८, चिखली येथे १४४, मोताळा येथे १२० असे एकूण ३६२ गावे गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

## जिल्हास्तरीय शालेय (मुले) फुटबॉल लिग स्पर्धा; १० जानेवारीपर्यंत अर्ज आमंत्रित



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणाद्वारे १३ वर्ष वयोगटातील शालेय प्रतिभावंत खेळाडुंचा शोध घेण्यासाठी जिल्हास्तरीय फुटबॉल (मुले) सन २०२५-२६ शालेय लिग स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जानेवरीपर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळेतील १३ वर्ष वयोगटातील खेळाडुंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरीता जिल्ह्यातील विविध शाळेतील संघाची नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे ऑफलाईन विनामूल्य नोंदणी करून संघाची यादी दि.१० जानेवारीपर्यंत कार्यालयात जमा करून प्रवेश निश्रि्चत करावा. सदर स्पर्धेसाठी खेळाडुंची वयोमर्यादा १ जानेवारी २०१२ नंतरचा जन्म झालेला खेळाडु सदर स्पर्धेकरीता पात्र राहील. स्पर्धेची तारीख आपणास नंतर कळविण्यात येईल.

सदर स्पर्धेकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त संघानी सहभाग नोंदवुन स्पर्धा यशस्वी करण्यास सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी एन.आर. वानखेडे ९९६०४३४४८७, एस.एस.केळे ९४२३४४६५१६ व डॉ. जे. डब्ल्यु मोहोड ९४०५७३४४०३ यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा.

# पांगरखेड वीज उपकेंद्राचा प्रश्न मार्गी लावणार - संजय रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ







**मेहकर/प्रतिनिधी :** पांगरखेड येथील विज उपकेंद्राचा प्रश्र्न महत्त्वाचा असून सदर मंजूर उपकेंद्र कार्यान्वित करून प्रश्र्न मार्गी लावणार असल्याचे माजी आमदार संजय रायमुलकर यांनी सांगितले. मेहकर मतदार संघासाठी अनेक पटींनी विकास कामे मंजूर करून आणणार आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

तालुक्यातील पांगरखेड येथील वीस लाख रुपये खर्चाच्या ग्रामपंचायत भवनांच्या बांधकामाचे भूमिपूजन आज माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते झाले. गजानन महाराज मंदिर परिसरात सात लाख रुपये खर्चाचे पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे माजी सभापती राजेंद्र पळसकर, दिलीपराव देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गजानन क्षीरसागर, प्रल्हादराव शिंगणे ,नागेश राजबिंडे, विश्र्वनाथ काटेकर ,लक्ष्मण गायकवाड ,गोपाल ठाकरे, सतीश सुर्वे, सरपंच सुधाकर धंदेरे ,उपसरपंच नंदकिशोर सुर्वे यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना संजय रायमुलकर म्हणाले की मतदारसंघात तीन हजार कोटींची जी कामे मंजूर करून आणली आहेत. त्याचा आरंभ आता सुरू आहे. महायुती सरकारने समाजाच्या सर्व घटकांसाठी अतिशय चांगले निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात घेतले होते. केंद्रात व राज्यात महायुतीचे सरकार असल्याने पूर्वीपेक्षा अधिक पटीने विकास कामे मंजूर करून आणणार आहे. सातत्याने लोकांच्या संपर्कात राहून त्यांची सेवा करत राहणे सुरू राहणार आहे.

दिलीपराव देशमुख ,राजेंद्र पळसकर यांची भाषणे झाली. शाखाप्रमुख वामनराव जसोद,विश्र्वनाथ पाखरे, सुधाकर काटेकर ,दशरथ सुर्वे, सीमाताई मांजरे ,संतोष शिरभाये, दलित शिंगणे ,नारायण सुर्वे ,श्याम सुर्वे, गणेश नालींदे ,सुभाष नालिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाल पाखरे यांनी केले.

सामाजिक वनीकरण विभाग व ग्रामपंचायत पांगरखेडा यांच्या संयुक्त प्रयत्नातून ६४ प्रकारच्या वृक्षांची चार एकर परिसरात लागवड केलेल्या आनंदघन प्रकल्पाची पाहणी संजय रायमुलकर यांनी केली. वनीकरण अधिकारी कैलास सरकटे व गावकरी यावेळेस उपस्थित होते.

## नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी संभाजी ब्रिगेड सह शेतकऱ्यांचे चटणी भाकर आंदोलन



**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य सरकारने जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे त्वरित अटी व शर्ती न लावता सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, शेतकऱ्यांचे मागील वर्षाचे कृषिमंत्र्यांनी मंजूर केलेले रखडलेले पिक विम्याचे पैसे तात्काळ खात्यावर जमा करावी यासह अन्य मागण्यांसाठी आज बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संभाजी ब्रिगेड आणि शेतकऱ्यांनी ठेचा भाकर खाऊन आंदोलन केले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली आहे.

## आजाराने ग्रस्त गो मातेला मिळाले युवकांच्या पुढाकाराने जीवनदान



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३१ डिसेंबरच्या रात्री छत्रपती संभाजी नगर ते नागपूर राज्य महामार्गावरील बुलढाणा जिल्ह्यांतील शेवटच्या टोकावर असलेले डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र समोर ही बेशुद्ध अवस्थेत एक गाय पडलेली असल्याचे निदर्शनात येतात रात्री दहा साडेदहा दरम्यान पत्रकार ज़ैनुल आबेद्दीन शेख त्यांचे सहकारी रात्री फिरत असताना अचानकपणे बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या गाईवर लक्ष गेल्यावर त्यांनी गो माता प्रेमी यांना संपर्क करून त्यांनी सविस्तर माहिती दिली.

अशातच गोमाता प्रेमी युवकांनी घटनास्थळी धाव घेऊन गाईला वाचवण्यासाठी विविध पशु संवर्धन डॉक्टरांना संपर्क केला असता सर्वांनी बाहेर असल्याचे सांगितले कारण सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सर्वात उत्सुक असल्यामुळे कोणीही खाजगी पशुवैद्यकीय अधिकारी त्या ठिकाणी येण्यास तयार नव्हते मात्र नागेश परमाळे या युवकांनी पुढाकार घेत स्वतः ची जेसीपी बदलवू जेसीपी मध्ये गाईला टाकून थेट पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये पोहोचून तेथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ आनंद आस्वार तथा त्यांचे सहकारी संतोष बोचरे यांनी गाईवर औषधोपचार केले. यावेळी नागेश परमाळे ,दीपक इंगळे, विशाल पांडव,मुन्ना आंबेकर, राम फिसके, विजय भंडारे, कृष्णा शेळके ,आदित्य नवघरे,सागर ताठे, पत्रकार गणेश लहाने पत्रकार आवेज पठाण हजर होते.

## अकोल्यात ३ हजार शेतकऱ्यांना आल्या नोटीस; अतिवृष्टी व अवकाळीची मदत परत देण्याची सरकारची मागणी






दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** २०२२ मध्ये अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसान भरपाईची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात २०२३ मध्ये जमा झाली. नुकसान भरपाईपोटी शासन निर्णयात नमूद मर्यादेपेक्षा जास्त मदत दिल्याचं सांगत सरकारनं शेतकऱ्यांना नोटीसा पाठवल्या आहेत. या नोटीसच्या माध्यमातून जास्तीची रक्कम परत मागण्यात आली आहे. त्यासाठी तेल्हारा तालुक्यात जवळपास ३ हजार शेतकऱ्यांना नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना पाठवण्यात आलेल्या नोटीसमध्ये असे सांगण्यात आले आहे की तुम्हाला देण्यात आलेल्या मदतीमध्ये अतिरीक्त निधी तुमच्या खात्यात जमा झाला असून ती रक्कम परत करावी अन्यथा कारावाई केली जाईल यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. हा आमच्यावरील अन्याय आहे, शासनाने हा विषय थांबवला पाहिजे असे शेतकऱ्यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या ‘गट ब व क’ सेवा संयुक्त पुर्व परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) व गट क सेवा सयुक्त पुर्व परिक्षा रविवार दि. ५ जानेवारी २०२५ व रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी नियोजित होत्या. तथापि दि. २३ डिसेंबर २०२४ च्या आयोगाचे पत्रानुसार नियोजित परीक्षांच्या दिनांकामध्ये बदल करण्यात आला असून महाराष्ट्र गट ब (अराजपत्रिका) सेवा संयुक्त पुर्व परिक्षा रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी तर महाराष्ट्र गट क सेवा सयुक्त पुर्व परीक्षा रविवार दि. ४ मे २०२५ रोजी होणार आहे. सुधारित परिक्षांच्या वेळपत्राकाचे सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी केले आहे.

## तीन महिन्याचा पगार न दिल्याने निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची तहसील कार्यालयावर धडक

दैनिक आपला विदर्भ




**अमरावती/प्रतिनिधी :** शासनाच्या निराधार योजने अंतर्गत अपंग, विधवा महिला, परितक्ता महिला, वयोवृद्ध लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्याला मिळणारा पगार मागील तीन महिन्यापासून देण्यात आलेला नाही. लाभार्थ्यांना तहसील कार्यालय व बँकेत चकरा माराव्या लागत असल्याने लाभार्थी हैराण झाले आहेत त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आज या लाभार्थ्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे युवासेना जिल्हाप्रमुख प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात धडक दिली. लवकरात लवकर या योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पगार द्या अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## २९ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान मद्य प्राशन करुन वाहन चालवणाऱ्या ४०६ चालकांवर वाहतूक विभागाची कारवाई

दैनिक आपला विदर्भ




**चंद्रपूर/प्रतिनिधी :** ३१ डिसेंबर व नववर्षाचे स्वागत जल्लोषात करण्यासाठी अतिउत्साही नागरिक मद्य प्राशन करून दुचाकी, चारचाकी वाहने भरधाव वेगाने चालवतात. सदर प्रकारावर आळा घालण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात दिनांक २९ डिसेंबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत संपूर्ण चंद्रपुर जिल्ह्यामध्ये ठिक ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती. जिल्ह्यातील वाढते अपघात कमी करण्याकरीता वाहतूक नियंत्रण शाखा चंद्रपुर व जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत मद्य प्राशन करून वाहन चालविणे, ट्रिपल सीट आणी बुलेटच्या सायलेन्सर याबाबत विशेष मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमे दरम्यान मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या ४०६ चालकांवर, ट्रिपल सिट वाहन चालविणाऱ्या ३७४ चालकांवर आणि बुलेटच्या सासलेन्सर मध्ये बदल करणाऱ्या २४ चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. कोणीही दारू पिऊन वाहन चालवू नये तसेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार पाटील यांनी केले आहे.

